| | |
|---|---|
| CNR MHSO170010392023 | दाखल तारीख – १५/०४/२०२३<br>नोंदणी तारीख – १८/०४/२०२३<br>निकाल तारीख – २५/०६/२०२६<br>कालावधी – **०३ वर्षे ०२ महिने १० दिवस** |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट नं.२), यांचे न्यायालयात,माढा

**(पिठासीन अधिकारी अनय डी. कुलकर्णी)**

नियमित फौजदारी खटला क्र. १३९/२०२३

नि.क्र. **२३/ब**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| **तक्रारदार / फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, टेंभुर्णी** पोलीस ठाणे, तालुका माढा, जिल्हा सोलापूर |
| प्रितिनिधीत्व | शासनातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ए. पी. काळे |
| **आरोपी** | **दत्तात्रय पांडुरंग लोंढे**<br>वय – ३८ वर्षे, व्यवसाय – मजूरी<br>आरोपी रा. बेंबळे, ता. माढा, जि.सोलापूर |
| प्रितिनिधीत्व | आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी. व्ही. देशपांडे |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ** | दिनांक ०२/०२/२०२३ रोजी २०.०० वाजताच्या सुमारास मौजे बेंबळे ता. माढा गावातील माहितीदार कैलास तुकाराम भोजने यांचे राहते घराचे समोरील ग्रामपंचायतचे रोडवरती |
| **प्रथम खबर अहवाल**<br>**दिनांक** | ५०/२०२३<br>०२/०२/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १८/०२/२०२६ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | २३/०६/२०२६ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | २५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २५/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

**भाग – क**

| आरोपी क्र | आरोपी चे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | फौ प्र सं च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दत्तात्रय पांडुरंग लोंढे | सीआरपीसी कलम (अ) (१) प्रमाणे नोटीस दिली. | १८/०२/ २०२६ | कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ | निर्दोष | - | - |

**फिर्यादी / बचाव पक्ष / न्यायालय / साक्षीदारांची यादी.**

**(अ) फिर्यादी/अभियोगपक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| पी.डब्ल्यु नं. १ | कैलास तुकाराम भोजने | माहितीदार |

**(ब) बचावपक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ क्र | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ क्र | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

## फिर्यादी / बचाव पक्ष / न्यायालय / निशाणी क्रमांक यादी.

### (अ) फिर्यादी/अभियोगपक्ष निशाणी क्रमांक यादी.

| अ क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

### (ब) बचावपक्ष मान्य केलेल्या दस्तऐवजांची यादी

| अ क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १६ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | १७ | माहितीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

### (क) बचावपक्ष निशाणी क्रमांक यादी.

| अ क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

### (ड) न्यायालय निशाणी क्रमांक यादी.

| अ क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

### (इ) मुद्देमाल वस्तु

| अ क्र | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | एमआर क्र. २२/२०२३ | एक हातात मावेल एवढया आकाराचा विटेचा तुकडा |

## न्यायनिर्णय

( जाहीर तारीख २५.०६.२०२६)

आरोपीवर भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये अपराधांकरीता संपरीक्षण करण्यात आले.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथनः–**

२) माहितीदार नामे कैलास तुकाराम भोजने यांचे असे कथन आहे की, दि. ०२/०२/२०२३ रोजी रात्री ८.०० वाजताचे सुमारास माहितीदार त्यांचे कपडयाचे दुकानातून त्यांचे घरासमोर आले असता माहितीदाराचा मुलगा नामे ओंकार याने माहितीदारास, “आपले गावातील आरोपी हे विनाकारण आपले

घरासमोर उभे राहतात" असे सांगितले. त्यावेळी माहितीदार यांनी आरोपीस विनाकारण आमचे घरासमोर का थांबतो अशी विचारणा केली असता आरोपीने माहितीदारास शिवीगाळ, दमदाटी करुन हाताने, लाथाबुक्याने मारहाण केली. आरोपीने जमिनीवर पडलेली वीट घेऊन माहितीदाराचे कपाळावर उजवे बाजूस मारुन दुखापत केली. सदर भांडणे माहितीदाराचे भाऊ नामे नागनाथ नामदेव भोजने यांनी सोडविले. त्यानंतर, माहितीदार तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे गेले. माहितीदारास पोलिसांनी यादी देऊन औषधोपचार घेणेकामी पाठवले. माहितीदार यांनी पाटील दवाखाना येथे औषधोपचार घेऊन आरोपीविरुध्द टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे प्रस्तुत फिर्याद दिली.

३) सदर फिर्यादी जबाब घेतल्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र. ५०/२०२३ नुसार भारतीय दंड विधानाच्या कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर प्रकरणाचा तपास पोहेकॉ/१११ बी. एस. हजारे यांनी केला. तपासादरम्यान ते घटनास्थळी गेले व त्यांनी घटनास्थळावरुन विटेचा तुकडा जप्त करुन घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदाराचे जबाब नोंदविले. तपासादम्यान आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये सबळ पुरावा मिळून आल्यामुळे सदर गुन्ह्यांसाठी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४) आरोपीविरुध्द भा. दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये नि.क्र. १० नुसार दोषारोप ठेवले. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगत संपरीक्षण करण्याची मागणी केली.

५) प्रकरणात आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आढळून आला नाही म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे बयान नोंदविण्यांत आले नाही.

६) अभियोगपक्ष व आरोपीच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणात निर्णयाप्रत येण्याकरीता खालील प्रश्न उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष मी सकारण पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दि. ०२/०२/२०२३ रोजी रात्री ८.०० वाजताच्या सुमारास मौजे बेंबळे ता. माढा गावातील माहितीदार यांचे | |

| | | |
|---|---|---|
| | राहते घराचे समोरील ग्रामपंचायतचे रोडवर आरोपीने माहितीदाराच्या कपाळावर उजव्या बाजूस विटाने माहितीदारास मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहोचवली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ०२. | उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने माहितीदारास हाताने, लाथाबुक्याने मारहाण केली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ०३. | उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने माहितीदाराचा इच्छापूर्वक अपमान करुन त्यायोगे त्याला प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने माहितीदारास शिवीगाळ करुन अपमानित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ०४. | उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने माहितीदारास दमदाटी केली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ०५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमीमांसा</u>

७) आरोपीविरुध्द लावलेले दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने प्रकरणात केवळ माहितीदास साक्षीदार म्हणुन नि.क्र. १५ अन्वये तपासले. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा व माहितीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले, त्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.क्र. १६ व १७ देण्यात आले.

८) सदर प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये प्रकरण आपसांत मिटल्याचे कथन करुन तडजोड करण्यासाठी फिर्यादी व आरोपींनी विनंती अर्ज नि.क्र. १४ वर दाखल केला. परंतु, कलम ३२४ भा.दं.वि. हा गुन्हा तडजोडजन्य नसल्याने अर्ज नामंजूर करुन आरोपीविरुध्द सदरचा खटला चालविण्यात आला. माहितीदार यांनी अभियोगपक्षाचे कथनास सुसंगत साक्ष दिलेली नाही आणि इतर

साक्षीदार तपासून काहीही निष्पन्न होणार नाही या कारणास्तव फिर्यादीतर्फे पुरावा बंद पुरसिस नि.क्र. १८ वर दाखल केली. सदर पुरसिस अन्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यांत आला.

**<u>प्रश्न क्र.०१ ते ०४ करीता–</u>**

९) माहितीदार (साक्षीदार क्र. १) यांनी साक्षीमध्ये असे कथन केले की, ते आरोपीला ओळखतात. त्यांना घटना कधी घडली होती याची तारीख सांगता येणार नाही. घटना तीन वर्षापुर्वी त्यांच्या घरी संध्याकाळी ९.३० वाजता घडली होती. घटनेवेळी त्यांना एका इसमाने दगडा मारला होता. परंतु, सदर साक्षीदाराने दगड कोणी मारला होता हे सांगता येणार नाही असे सांगितले आहे. त्यांनी आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली नव्हती. सदर साक्षीदाराने फिर्यादवरील त्यांची सही मान्य केली परंतू फिर्यादमधील मजकुर माहित नाही असे सांगितले. त्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. अभियोगपक्षातर्फे सदर माहितीदारास न्यायालयाच्या परवानगीने उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले परंतू सदर प्रश्नांना माहितीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली. त्यामुळे, अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द कोणताही सुचक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर माहितीदार यांनी फिर्यादी जबाबामधील अधोरेखांकित भाग 'अ' पोलिसांना सांगितला नव्हता आणि सदर जबाबात तो का नमूद आहे याचे कारण सांगू शकत नाही असेही स्पष्टपणे कथन केले आहे.

१०) माहितीदाराने पुढे मान्य केले की, सदरचे प्रकरण आरोपी व त्यांनी आपसांत मिटविले आहे. सदर माहितीदाराने, आरोपीने माहितीदाराच्या कपाळावर उजव्या बाजूस विटाने माहितीदारास मारहाण करुन ईच्छापुर्वक जखमी केले. तसेच, माहितीदारास हाताने, लाथाबुक्याने मारहाण केली. आरोपीने माहितीदारास शिवीगाळ करुन दमदाटी केली असे कोणतेही वक्तव्य अभिलेखावर सांगितले नाही. त्यामुळे, आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा दोषारोप सिध्द होण्यासाठी मिळून आला नाही असे दिसून येते.

११) सबब, उपरोक्त अभिलेखावरील पुराव्यावरुन घटनेच्यावेळी दि. ०२/०२/२०२३ रोजी रात्री ८.०० वाजताच्या सुमारास मौजे बेंबळे ता. माढा गावातील तक्रारदार यांचे राहते घराचे समोरील ग्रामपंचायतचे रोडवर आरोपीने माहितीदाराच्या कपाळावर उजव्या बाजूस विटाने माहितीदारास मारहाण करुन

ईच्छापुर्वक दुखापत पोहोचवली. तसेच, आरोपीने माहितीदारास हाताने, लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ करुन दमदाटी केली या बाबी सिध्द करण्यास अभियोगपक्षास यश आले नाही असे दिसून येते. बचावपक्षाने माहितीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र व घटनास्थळ पंचनामा जरी मान्य केला असला तरी माहितीदारास सदर प्रमाणपत्रात नमूद असलेल्या जखमा आरोपीमुळे झाल्या हे सिद्ध होत नाही. त्यामुळे, प्रश्न क्रमांक ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यांत येत आहेत.

**<u>प्रश्न क्र.०५ करीता–</u>**

१२) वर नमूद प्रश्न क्र.०१ ते ०४ च्या नकारार्थी निष्कर्ष लक्षात घेता, आरोपी प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. आरोपीने नि.क्र. ०१ वरील आदेशाप्रमाणे फौ.प्र.सं. कलम ४३७(अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात न्यायनिर्णयाविरुध्द अपील झाल्यास हजर होणेसाठी रक्कम रुपये पंधरा हजाराचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनदाराचे बंधपत्र सादर करुन सदर तरतूदीची पुर्तता केली आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश–

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **दत्तात्रय पांडुरंग लोंढे** याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) तरतूदी अनुसार भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ च्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीने यापुर्वी दिलेले बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | गुन्ह्यातील एमआर क्र. २२/२०२३ अन्वये जप्त असलेला मुद्देमाल एक विटेचा तुकडा मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यावर नियमानुसार नष्ट करण्यात यावा. |

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.06.25 17:02:58 +0530

दिनांक : २५/०६/२०२६ **(अनय डी. कुलकर्णी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र. २, माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 25/06/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 25/06/2026 |